# B. N. Bandodkar College of Science, Thane.
## Junior College
## S.Y.J.C. 1st Term Examination, October 2014
## Subject – Marathi

Day: Friday
Date: 10/10/2014

Time: 11.00 am to 01.00 pm
Max. Marks: 50

सूचना : सर्व प्रश्न अनिवार्य आहेत .

प्र.1 कोणत्याही एका विषयावर 300 शब्दांत निबंध लिहा 10

1) मला बालपण परत मिळाले तर............ .

2) आजचे चित्रपट आणि समाज

3) परीक्षेच्या निकालाचा दिवस

4) भ्रमणध्वनी (Mobile) चा वाढता वापर

प्र.2 खालील काव्यवेच्याचे रसग्रहण करा 06

अ) आत्महत्या हा पर्याय नाही

अपयश ही यशाची पहिली पायरी असते . जीवनातल्या अनुभवांची डायरी असते . त्यातूनच प्रत्येकाचे घडत जाते भविष्य मग कळून येते किती सुंदर आहे आयुष्य प्रसत्नांच्या बळावर सर करता येत शिखर'लाथ मारेन तिथे पाणी काढेन ' ही ठेवा जिगर कुठल्या समस्येला नाही आत्महत्या हा पर्याय सदा पुढेच जायचे संकटावर ठेवून पाय नापास होणं म्हणजे नाही आभाळ कोसळणं जीवन म्हणजे असतं निरंतर शिकणं परीक्षा नाही ठरवू शकत आयुष्याचे मोल अंगी बाणवावी कला अन् सावरावा तोल दुर्गम कडा भेदण्याची ठेवा दुर्दम्य अभिलाषा मग येणारच नाही तुमच्याजवळ निराशा .

कवी .मुबारक शेख

किंवा

स्त्रीभ्रूणहत्येविषयी स्त्रीरोगतज्ज्ञांशी संवाद ( प्रश्नोत्तरे रूपाने मुलाखत लिहा) 04

ब) खालील प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा

1) खालील नामासाठी योग्य पर्याय निवडा

<u>पाणी</u>

1) कडक 2) साजूक 3) तळलेलं 4) फसफसणारं

2) खालील शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा .

<u>विकल्प</u>

1) स्वरूप 2) निरागस 3) भव्य 4) पर्याय

3) गटात न बसणारा शब्द ओळखा

<u>चवदार</u>

1) भरदार 2) दमदार 3) टूमदार 4) गपगार

4) <u>शेजारी-पाजारी</u>

1) तेल-विल 2) माणसं-बिणसं 3) मटण-बिटण 4) आई-बाबा

प्र.3 खालील प्रश्नांच्या उत्तराचा योग्य पर्याय निवडा

अ) निर्दोष शब्द ओळखा — 02

1) 1) स्पर्धाशून्य 2) स्पर्धाशुन्य 3) स्पधार्शून्य 4) स्पर्धाशून्य

2) 1) कूतार्थ 2) कृतार्थ 3) कृर्ताथ 4) कृथात

ब) खालील वाक्प्रच्यारांच्या अर्थाचा योग्य पर्याय निवडा — 02

1) गराडा घालणे

1) चहुबाजूंनी वेढणे 2) वाऱ्यावर सोडणे 3) चहुबाजूस जाणे 4) चहुबांजूस भरकटणे

2) पाय लटपटू लागणे

1) संताप येणे 2) लपून बसणे 3) भीतीमुळे गोंधळून जाणे 4) माफी मागणे

क) खालील पारिभाषिक शब्दांसाठी योग्य पर्याय निवडा — 02

1) Antinational

1) राजदूत 2) राष्ट्र 3) राष्ट्रद्रोही 4) राष्ट्रध्वज

2) Sunstroke

1) सूर्योदय 2) सूर्यास्त 3) उष्मांक 4) उष्माघात

प्र.4 कोणत्याही *एका प्रश्नाचे* उत्तर 100 शब्दांत लिहा. — 08

1) बॅंडच्या आवाजामुळे लेखकाच्या मनात कोणत्या शंका आल्या?

2) चाफा कुठे गेला ? त्याने कोणकोणता शिणगार केला ? का ?

3) 'भुताच्या जन्म' कथेतील विनोद स्पष्ट करा.

प्र.5 कोणत्याही *दोन प्रश्नांची* उत्तरे 80 शब्दांत लिहा. — 12

1) लेखकाचे नंदनवन कसे व काठे आहे ?

2) डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलामांच्या व्यक्तित्वाला आकार देणारी पुस्तके कोणती? या पुस्तकांतून कोणती संस्कारमुल्ये रूजतात?

3) कर्नल श्याम चव्हाणांच्या कैदेची कहाणी थोडक्यात लिहा.

प्र.6 कोणत्याही *एका प्रश्नाचे* उत्तर लिहा. — 04

1) आवाहन कवितेचे रसग्रहण करा.

2) अखंड कवितेमधील मूल्ये सांगा.

~*~*~*~*~*~*~*~*~*~*~